**५.५८ एफएल ०१०७०९ एफ**

**भारतीय रिझर्व बँक**

**WWW.rbi.org.in**

**आरबीआय/२००९-१०/५८**

डीबीएस. एफआरएफसी.बीसी,क्र.१/२३-४-००१/२००९-१० जुलै ०१, २००१

सर्व वाणीज्य बँकांचे (आरआरबी सोडून)
आणि वित्तसंस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

महोदय,

**फसवणुकी - वर्गीकरण व कळविणे**

कृपया, 'फसवणुकी - वर्गीकरण व कळविणे' ह्यावरील आमच्या महापरिपत्रकासोबत पाठविलेल्या आमचे पत्र डीबीएस.एफआर एफसी. बीसी. क्र. १५/२३.०४.००१/२००८-०९ दि. जुलै ०१ २००८ चा संदर्भ घ्यावा. येथे नोंद घेतली जावी की, जुलै १, २००८ रोजीच्या महा परिपत्रकाच्या तारखेपासून असलेल्या सर्व सूचना ह्या महापरिपत्रकात अद्यावत करुन एकत्रित करण्यात आल्या आहेत.

तसेच, ह्या महापरिपत्रकात, ह्या वर्षादरम्यान आरबीआयने बँकांना दिलेल्या विशिष्ट स्पष्टीकरणांवरील सूचनाही समाविष्ट करण्यात आल्या आहेत. हे महापरिपत्रक जून ३०, २००९ रोजी अद्यावत करण्यात आले असून रिझर्व बँकेच्या www.rbi.org.in ह्या वेबसाईटवरही करण्यात आले आहे.

आपला,
(पी.के.पांडा)
मुख्य महाव्यवस्थापक

**अनुक्रमणिका**


**१) प्रस्तावना** **२**

**२)फसवणुकीचे वर्गीकरण** **४**

**३) आरबीआयकडे फसवणुकीचा अहवाल पाठविणे--------** **५**

३.१ रु १.० लाख त्यावरील रकमेच्या फसवणुकी ५

३.२ तत्वशून्य कर्जदारांची केलेल्या फसवणुकी ६

३.३ रु १०.० लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी ७

३.४ फसवणुकी करण्याबाबतची प्रकरणे ७

**४)तिमाही अहवाल** ८

४.१ शिल्लक फसवणुकीवरील अहवाल ८

४.२ फसवणुकीच्या प्रकरणांवरील प्रगती अहवाल ९

**५) संचालक मंडळाला दिलेला अहवाल** **१०**

५.१ फसवणुकीचे प्रकरणे कळविणे १०

५.२ फसवणुक-प्रकरणांचे तिमाही पुनरावलोकन १०

५.३ फसवणुकी प्रकरणांचे वार्षिक पुनरावलोकन ११

**६) पोलिस/सीबीआय ह्यांना फसवणुकी कळविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे** **१२**

**७) चोरी, बँकफोडी, डाका आणि बँक लुटण्याची प्रकरणे कळविणे** **१४**


**फसवणुकीबाबतच्या देखरेखीचा अहवाल**


एफएमआर-१ बँकांमधील प्रत्यक्ष किंवा संशयित फसवणुकीवरील अहवाल १५

एफएमआर-२ शिल्लक फसवणुकीच्या शिल्लक प्रकरणांवरील तिमाही अहवाल २०

एफएमआर-३ फसवणुकीच्या प्रकरणांचा तिमाही प्रगती अहवाल २५

एफएमआर-४ डाके/बँकफोडी/ चोऱ्या/ लुटालुटीवरील अहवाल २८

## १) प्रस्तावना

१.१) बँकांमध्ये फसवणुकी, चोऱ्या, डाका, घातला जाणे ही एक काळजीची गंभीर बाब आहे. अशा फसवणुकी होऊ न देण्याची मूळ जबाबदारी बँकांवरच असली तरीही रिझर्व बँक (आरबीआय) वेळोवेळी बँकांना फसवणुकी होऊ शकणारी क्षेत्रे व फसवणुकी टाळण्यासाठी आवश्यक असे सुरक्षा उपाय कळवतच आहे. रिझर्व बँक, इतर बँकांना, आधी न घडलेल्या - कळविलेल्या अत्यंत हुशारीने केलेल्या फसवणुकीबाबतची सविस्तार माहिती कळवित असते, की त्यामुळे सुयोग्य अशा कार्यरीतींचे व अंतर्गत तपासणीचे आयोजन करुन बँका आवश्यक ते सुरक्षा उपाय/फसवणुकी कळण्याचे उपाय ह्यांचे अवलंबन करु शकतील. ज्यांनी बँकांना फसविले आहे असे तत्वशून्य कर्जदार व संबंधित पक्ष ह्यांच्या संबंधीची माहितीही बँकांना देण्यात येतच आहे की ज्यामुळे बँका त्यांच्याशी व्यवहार करते वेळी सावधगिरी ठेवतील. रिझर्व बँकही, कल्पक स्वरुपाच्या व आधी पाहण्यात न आलेल्या फसवणुकी बँकांना कळवीतच असते, ज्यामुळे योग्य अशा कार्यरीती व अंतर्गत तपासण्याच्या द्वारे बकाँ सावधानता/फसवणुकी टाळण्याचे उपाय  योजू शकतील. बँकांची फसवणुक करणारे तत्वशून्य कर्जदार व संबंधित पक्ष ह्यांच्याबाबतही बँकांना कळविण्यात आलेले आहे, व त्यामुळे त्यांच्याबरोबर व्यवहार करतांना बँकांना सावधान राहता येईल. ही प्रक्रिया सातत्याने होत रहावी ह्यासाठी, बँकांनी, फसवणुकी व त्यावर त्यांनी त्याबाबत केलेला पाठपुरावा ह्याबाबतची संपूर्ण माहिती आरबीआयला कळविणे आवश्यक आहे. ह्यासाठी पुढील परिच्छेदात दिल्याप्रमाणे फसवणुकी कळविण्याबाबतची प्रणाली स्वीकारली जावी.

१.२) रु १.०० कोटी व त्यावरील फसवणुकींचा अहवाल संचालक मंडळाच्या विशेष समितीला कळविण्यासाठी परिच्छेद ५.२.४ चा संदर्भ घेतला जावा.

१.३) असे दिसून आले आहे की, अनेकदा बँकेत फसवणुकी झाल्यानंतर बऱ्याच काळानंतर त्या उघडकीस येतात. कधीकधी आरबीआयकडे पाठविलेले फसवणुकींचे अहवाल विलंबाने आणि संपूर्ण माहिती न देता पाठविले जातात. कधीकधी तर वर्तमानपत्रातील बातम्यांमधूनच मोठ्या रकमांच्या फसवणुकी झाल्याचे आरबीआयला कळते. ह्यासाठी बँकांनी खात्री करून घ्यावी की फसवणुकीची माहिती कळविण्याबाबतची त्यांची प्रणाली व्यवस्थित असेल व त्यामुळे फसवणुकीबाबतची माहिती अविलंब कळविली जाईल. आरबीआयला फसवणुकीची प्रकरणे कळविण्यातील विलंबाबत बँकांनी त्यांचा कर्मचाऱ्याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे.

१.४) फसवणुकी कळविण्याबाबतचा विलंब व त्यामुळे होणारा, अन्य बँकांना फसवणुक करण्याची कार्यरीत कळविण्यामधील विलंब व परिणामी तत्वशून्य कर्जदाराबाबत बँकांना द्यावयाच्या सावधानतेच्या इशाऱ्यामधील विलंब ह्यामुळे अन्य ठिकाणीही अशाच फसवणुकी केल्या जाऊ शकतात. ह्यांसाठी बँकांनी, फसवणुकीची प्रकरणे आरबीआयला विहित केलेल्या कालावधीने काटेकोरपणे पालन केले पाहिजे, अन्यथा अशा बँकांना बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ४७८(अ) खाली दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल.

१.५) जून २००३ मध्ये बँकांना 'फ्रॉड्स रिपोर्टिंग अँड मॉनिटरिंग' वरील एक सॉफ्टवेअर पॅकेज पुरविले गेले होते. आणि ह्या सॉफ्टवेअरच्या नंतरच्या आवृत्त्या, डिसेंबर २० २००५ तारखेच्या आरबीआयचे परिपत्रक डीबीएस. एफजीव्ही (एफ) क्र. ८८९७/२३.१०.००१/२००५-०६ द्वारा

कळविण्यात आल्या होत्या. ह्यासंबंधीचे रिटर्न व माहिती विहित केल्यानुसार फक्त सॉफ्टकॉपीने (हार्ड व सॉफ्ट अशा दोन्हीही कॉपीजमध्ये पाठवावयाचे एफएमआर -१ रिटर्न सोडून) आरबीआयच्या केंद्रीय कार्यालयाकडे तसेच त्या बँकेंचे मुख्य कर्यालय ज्याच्या अधिकार कक्षेत येते त्या प्रादेशिक कार्यालयाच्या बँकिंग पर्यवेक्षण विभागाकडे बँकांनी पाठविणे आवश्यक आहे.

१.६) ह्या परिपत्रकात संदर्भित केलेले सर्व अहवाल पाठविण्याची जबाबदारी असलेला व महाव्यवस्थापकाचा दर्जा असलेला एक विशेष अधिकारी बँकांनी नेमस्त करावा.

१.७) प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात, केंद्रीय कार्यालयातील बँकिंग पर्यवेक्षण विभाग, फसवणुकी कळविण्याची जबाबदारी असलेल्या बँकेच्या/ वित्तसंस्थांच्या अधिकाऱ्यांची एक डिरेक्टरी प्रसिध्द करील. प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर १५ पर्यंत, बँका/ वित्तसंस्थांनी, ह्या डिरेक्टरीत समाविष्ट करण्यासाठी अशा अधिकाऱ्यांच्या नावातील बदल, केंद्रीय कार्यालयातील, बँकिंग पर्यवेक्षण विभागाच्या फ्रॉड मॉनिटरिंग कक्षाला कळवावेत.

## (२) फसवणुकीचे वर्गीकरण

२.१) अहवाल पाठविण्यात एकसमानता असावी ह्यासाठी भारतीय दंड संहितेमधील तरतुदींवर आधारित फसवणुकीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.
अ) अफरातफर व गुन्हेगारी स्वरुपाचा विश्वासघात
ब) बनावट संलेखाद्वारे लबाडीने रोखीकरण, खाते पुस्तकात लबाडीने फेरफार किंवा खोट्या खात्याद्वारे व मालमत्तेच्या रुपांतरणाद्वारे.
क) बक्षिस किंवा बेकायदेशीर लाभासाठी अनाधिकृत कर्जसुविधा देणे.
ड) निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट
ई) फसविणे व बनावटीकरण
फ) विदेशी मुद्रेच्या व्यवहारातील अनियमितता
ग) वरीलपैकी विशिष्ट शीर्षकांखाली न येणारी अन्य प्रकारची फसवणुक

२.२) वरील (ड) व (फ) मध्ये संदर्भित अशी "निष्काळजीपणा व रोख रकमेत तूट" आणि "विदेशी मुद्राव्यवहारातील अनियमितता" ह्याबाबतची प्रकरणे ही फसवाफसवी/अफरातफर बाबतचा हेतु सिध्द झाल्यास/संशयास्पद असल्यास त्याचा अहवाल पाठविला जावा. तथापि, पुढील बाबतील, उघडकीस आल्यावर फसवाफसवीचा हेतु सिध्द न झाल्यास/ संशयित न वाटल्यासही ती प्रकरणे त्यानुसार कळविली जावीत.

अ) रोख रकमेत रु १००००/- पेक्षा जास्त तूट असलेली प्रकरणे आणि

ब) व्यवस्थापन/ऑडिटर/तपासनीस ह्यांना आढळलेली व रोख रक्कम हाताळणाराने तूट आल्याच्या दिवशीच न कळविलेली अशी रु ५०००/- पेक्षाधिक रोख रक्कम तूट असलेली प्रकरणे.

२.३) एकसमानता येऊन पुनरावृती टाळण्यासाठी, बनावट संलेखाबाबतच्या फसवणुकी फक्त प्रदान करणाच्या बँकरनेच कळवाव्यात. तथापि, एखाद्या चोख/खऱ्या संलेखाची रक्कम ही मालक

नसलेल्या व्यक्तीने लबाडीने लंपास करण्याबाबत मात्र फसविल्या गेलेल्या गोळा करणाऱ्या बँकेने फसवणुकीचा अहवाल आरबीआयकडे पाठवावा. प्रत्यक्ष वटविण्यापूर्वीच रक्कम क्रेडिट केली गेली आहे व तो संलेख खोटा/बनावट असून देणाऱ्या (पेईंग) बँकेने परत पाठविला आहे अशा संलेखांच्या गोळा करण्याच्या प्रकरणात, गोळा करणाऱ्या बँकेने आरबीआयकडे एफएमआर - १ सादर करावा, कारण तो संलेख वटविला जाण्यापूर्वीचे त्याचे पैसे दिले गेल्याने तिचा तोटा झाला आहे.

**२.४)** एकाच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित फेरफार केलेल्या/खोट्या चेक्सचे रोकडीकरण.

२.४.१) एकाच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित व फेरफार केलेल्या/खोट्या चेकच्या गोळा करण्याबाबत, जेथे त्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे रोकडीकरण झालेले आहे त्या शाखेने ती फसवणुक त्या बँकेच्या मुख्य कार्यालयाला कळवावी. त्यानंतर त्या बँकेचे मुख्य कार्यालय आरबीआयकडे फसवणुकीचा रिर्पोट दाखल करील.

२.४.२) कोअर बँकिंग सोल्युशन (सीबीएस) खाली,एखाद्या बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांशी संबंधित, एखाद्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे पैसे दिले गेल्यास कोणत्या शाखाने अहवाल पाठवावा ह्याबाबत वाद/मतभेद असू शकतो. म्हणजे त्या चेकाच्या आदेशकाचे खाते असलेली शाखा की जेथे त्या चेकाचे रोकडीकरण झाले आहे ती शाखा. अशा बाबतीतही, ज्या शाखेने त्या फेरफार केलेल्या/खोट्या चेकचे प्रदान केले आहे. त्याच शाखेने बँकेच्या मुख्य कार्यालयात अहवाल दाखल करावा. त्यानंतर ते मुख्य कार्यालय आरबीआयकडे फसवणुकीचा रिपोर्ट दाखल करील.

२.५) चोरी, बँकफोडी, दरोडा, डाका ह्यांची प्रकरणे फसवणुकी म्हणून कळविण्यात येऊ नयेत. अशा प्रकरणांचा अहवाल परिच्छेद ७ मध्ये दिल्यानुसार वेगळा पाठविला जावा.

२.६) विदेशात शाखा/कार्यालये असलेल्या बँकांनी (विदेशी बँक सोडून) अशा शाखा/कार्यालयात झालेल्या फसवणुकीचा अहवालही खालील परिच्छेद ३ खाली दिलेल्या नमुन्यानुसार व कार्यरीतीनुसार आरबीआयकडे पाठवावा.

## (३) भारतीय रिझर्व बँकेला फसवणुकीबाबत कळविणे.

३.१) रु.१/- लाख व त्यावरील फसवणुकी

३.१.१) रु १ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या व खोटेपणा, विश्वासघात, खातेपुस्तकातील फेरफार, चेक्स, ड्राफ्ट्स विनिमयदेयके ह्यासारख्या संलेखाचे लबाडीने केलेले रोखीकरण, बँकेला चार्ज केलेल्या सिक्युरिटीज अनाधिकृतपणे हाताळणे, मिसफीझन्स, अफरातफर, निधीचा गैरवापर, मालमत्तेचे रुपांतरण, फसवणुक, तूट, अनियमितता इत्यादींद्वारे केलेल्या फसवणुकीबाबतच्या सर्व प्रकरणांचा अहवाल ताबडतोब पाठविला गेला पाहिजे.

३.१.२) केंद्रीय अन्वेषण एजन्सीद्वारा जेथे गुन्हेगारी प्रकरणे दाखल केली आहेत आणि/किंवा जेथे रिझर्व बँकेने अशी प्रकरणे फसवणुक म्हणून कळविली जावीत असे निदेश दिले आहेत अशा फसवणुकीच्या प्रकरणांबाबतही फसवणुक अहवाल सादर करण्यात यावा.

३.१.३) बँका, त्यांच्या सहाय्यक कंपन्या, संलग्न कंपन्या/संयुक्त उद्योग ह्यामध्ये घडलेल्या फसवणुकींचे अहवालही पाठवू शकतात. तथापि, अशा फसवणुकींचा समावेश शिल्लक (आउटस्टँडिंग) फसवणुकींवरील अहवालात आणि खालील परिच्छेद ४ मध्ये संदर्भित तिमाही प्रगती अहवालत केला जाऊ नये.

३.१.४) सर्व प्रकारच्या फसवणुकींचे अहवाल सॉफ्ट कॉपीमध्ये व रु ५ लाख व त्यावरील फसवणुकीचे अहवाल हार्ड कॉपीमध्ये, त्या फसवणुकी उघडकीस आल्याच्या तीन आठवड्यांच्या आत, एफएमआर-१ नमुन्यात दिल्याप्रमाणे, केंद्रीय कार्यालयाकडे (सीओ) तसेच, त्या बँकेचे मुख्य कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्रात येते त्या आरबीआयच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयातील बँकिंग सुपरव्हिजन विभागाकडे पाठविले जावेत. तथापि रु १ लाख व त्यावरील रक्कम आणि रु.५ लाखांपेक्षा कमी रकमेच्या फसवणुकींच्या अहवालची हार्ड कॉपी फक्त आरबीआयच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयातील बँकिंग सुपरव्हिजन विभागाकडे पाठविली जावी.

### ३.२) तत्वशून्य कर्जदारांनी केलेल्या फसवणुकी

३.२.१) असे दिसून आले आहे की, कंपन्या, भागिदारी कंपन्या/मालकी कंपन्या आणि/किंवा त्यांचे संचालक/भागीदार ह्यांच्याद्वारे तत्वशून्य कर्जदारांद्वारे मोठ्या संख्येने फसवणुकी केल्या गेल्या आहेत. त्यामधील निरनिराळ्या प्रकारच्या कार्यरीती म्हणजे--

१)संलेख लबाडीने वटविणे किंवा रक्कम मिळविण्यात काईट फ्लाईंग करणे.

२) तारण ठेवलेला मालसाठा लबाडीने काढून घेणे/असा तारण ठेवलेला मालाची बँकेला माहिती न देता वासलात लावणे/मालाच्या विवरणपत्रात त्याचे मूल्य फुगवून दाखविणे व बँकेकडून अतिरिक्त वित्त मिळविणे.

३) कर्जदार एकका बाहेर निधी वळविणे, कर्जदारांद्वारे दखल न घेतली जाणे, गुन्हेगारी स्वरुपाचा निष्काळजीपणा दाखविला जाणे, तसेच व्यवस्थापकीय स्तरावरील अपयशामुळे ते एकक आजारी होणे व कर्जखात्यामधील व्यवहारांबाबतच्या कार्यक्षम पर्यवेक्षणामध्ये बँकांद्वारे ढिलाई केली जाणे व त्यामुळे दिलेली आग्रिम राशी वसूल करण्यास कठीण होणे.

३.२.२) कर्जखात्यामधील फसवणुकींबाबत एफएमआर-१च्या भाग-ब खाली विहित केल्याप्रमाणे अतिरिक्त माहिती दिली जावी.

३.२.३) तत्वशून्य असे कर्जदार, कर्जदार कंपन्या, भागीदार/मालकी कंपन्या व त्यांचे संचालक, भागीदार व मालक इत्यादींच्या कर्ज गरजेचे मूल्यमापन करताना तसेच बँकांची फसवणुक करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांबाबतही बँकांनी योग्य ती सावधानता बाळगावी.

वरील कर्जदार-लफंग्यांच्या व्यतिरिक्त, बिल्डर्स, बेअरहाउस/कोल्ड स्टोअरेज मालक, मोटारी/ट्रॅक्टर्सचे व्यापारी, ट्रॅव्हल एजंट्स इत्यादि, तसेच आर्किटेक्ट्स, व्हॅल्युअर्स, चार्टर्ड अकाउंटंडस, ॲडव्होकेट्स इत्यादींसारख्या तिसऱ्या पक्षांनाही, कर्ज मंजुरी/ कर्ज वाटप इत्यादींमध्ये किंवा फसवणुकीमध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावली असल्यास जबाबदार धरण्यात यावे

फसवणुकींमध्ये गुंतलेल्या अशा तृतीय पक्षांबाबतही बँकांनी इंडियन बँक्स असोशिएशनकडे (आयबीए) कळवावे.

आयबीएला कळविण्यापूर्वी, संबंधित तिसऱ्या पक्षांचा त्यात हात आहे काय ह्याबाबत बँकांचे समाधान झाले असले पाहिजे आणि त्यांना सुनावणीची संधीहि दिली गेली पाहिजे. ह्याबाबत बँकांनी ठरीव कार्यरीतींचे पालन करावे आणि अनुसरलेल्या प्रक्रियांची नोंद करुन ठेवावी. अशा माहितीच्या आधारे आयबीए, बँकांना कळविण्यासाठी अशा तृतीय पक्षांची सावधानता यादी तयार करील.

## ३.२.४) बहुविध बँकिंग व्यवस्था असलेल्या कर्ज खात्यामधील फसवणुकी

"बहुविध बँकिंग व्यवस्था" खाली कर्ज सुविधांचा लाभ घेणारे काही तत्वशून्य कर्जदार, वित्तपुरवठा करण्याऱ्या बँकांपैकी एकीला फसवूनही वित्तपुरवठा करणाऱ्या अन्य बँकांच्या सुविधाचा लाभ घेत असतात आणि काही बाबतीत तर अशा बँकांमध्ये उच्चतर मर्यादा मिळवतात. काही बाबतीत असे कर्जदार वित्तपुरवठा करणाऱ्या इतर बँकांमधील खात्यांचा उपयोग ते फसवत असलेल्या बँकांतील निधी काढून घेण्यासाठी करतात. ह्याचे कारण म्हणजे निरनिराळ्या कर्जदायी बँका/वित्तसंस्था ह्यांच्या दरम्यान माहितीची देवाण-घेवाण करण्याबाबतचा अभाव. काही फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये कर्जदारांनी तीच प्रतिभूती अनेक बँकाना दिलेली असते.

ह्या सगळ्याचा विचार करता "मल्टिपल बँकिंग" व्यवस्थेखाली एखाद्या कर्जदाराला वित्तपुरवठा करणाऱ्या बँकांनी, सर्वानुमत अशा डावपेचांवर आधारित व परस्पर सहकार्याने कायदेशीर/ फौजदारी कारवाई, वसूलीसाठी पाठपुरावा, कार्यवाहीच्या माहितीची देवाण-घेवाण करुन रिझर्व बँकेला कळविलेल्या फसवणुकींवरील माहितीचे सातत्य राखले पाहिजे. ह्यासाठी, एखाद्या बँकेला फसवणुक आढळून आली की तिने मल्टीपल बँकिंग व्यवस्थेमधील इतर बँकांनाही ती माहिती पुरवली पाहिजे.

## ३.३) रु १००.०० लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकी

रु १०० लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकीबाबत, वरील परिच्छेद ३.१ व ३.२ मध्ये दिलेल्या आवश्यकतांच्या व्यतिरिक्त, रु.१०० लाख व त्यावरील फसवणुकीच्या बाबतीत बँका, एका डीओ पत्राद्वारे महाव्यवस्थापक, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, आरबीआय, केंद्रीय कार्यालय ह्यांना त्या बँकेच्या अशी फसवणुक आढळल्यावर एक आठवडयाच्या आत कळवू शकतात. ह्या पत्रामध्ये थोडक्यात माहिती दिली जावी, म्हणजे संबंधित रक्कम, फसवणुकीचा प्रकार, फसवणुकीची कार्यरीत शाखा/कार्यालयाचे नाव, संबंधित पक्षांची नावे (मालकी/भागीदारी किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या तसेच मालक, भागीदार व संचालकाची नावे), संबंधित अधिकाऱ्यांची नावे आणि पोलीस/आरबीआय ह्यांचेकडे तक्रार दाखल केली आहे काय. ह्या डीओ पत्राची एक प्रत, फसवणुक घडलेले कार्यालय ज्याच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या आरबीआयच्या प्रादेशिक कार्यालयाकडेही पाठवावी.

## ३.४) फसवणुकीचा प्रयत्न केला जाण्याची प्रकरणे

जेथे फसवणुक करण्याचा प्रयत्न केला गेला अशून ती तशी झाल्यास संभाव्य नुकसान रु १.०० कोटी किंवा अधिक झाला असता अशी प्रकरणे, फ्रॉड मॉनिटरिंग सेल, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई ह्यांना, बँकेची अशी फसवणुक असफल झाल्याचे किंवा

हाणून पाडण्याच्या दोन आठवड्यांच्या आत कळविली जावीत. ह्या अहवालात पुढील गोष्टींचा समावेश असावा :

- फसवणुकीच्या प्रयत्नाची कार्यरीत
- हा प्रयत्न करुनही प्रत्यक्ष फसवणुक कशी झाली नाही किंवा तो प्रयत्न कसा हाणून पाडला.
- विद्यमान प्रणाली व नियंत्रणे बळकट करण्यासाठी बँकेने योजलेले उपाय
- ज्या क्षेत्रात फसवणुकीचा प्रयत्न झाला तेथे नव्या प्रणाली व नियंत्रणे राबविली जात आहेत काय.

फसवणुक करणाच्या अशा प्रयत्नांबाबतचे अहवाल मंडळाच्या ऑडिट समितिसमोर ठेवले जावेत.

आरबीआयकडे पाठवावयाच्या इतर अहवालांमध्ये अशी प्रकरणे समाविष्ट करु नयेत.

## (४) तिमाही अहवाल (रिटर्न्स)

### ४.१) शिल्लक फसवणुकीवरील अहवाल

४.१.१) बँकांनी, एफएमआर-२ नमुन्यामध्ये दिल्यानुसार शिल्लक फसवणुकीबाबतच्या तिमाही अहवालची प्रत्येकी एक प्रत रिझर्व बँकेचे केंद्रीय कार्यालय व त्या बँकेचे मुख्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या कार्यालयाकडे संबंधित तिमाहीची अखेर झाल्याच्या १५ दिवसांच्या आत पाठवावी. ही माहिती केवळ सॉफ्ट कॉपीच्या स्वरुपातच पाठवावी. तिमाहीच्या अखेरीस शिल्लक अशी फसवणुक नसल्यास त्या बँकांनी **निल** रिपोर्ट पाठवावा.

४.१.२) ह्या अहवालाच्या विभाग अ मध्ये त्या तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेल्या फसवणुकीची माहिती द्यावयाची असते. विभाग ब व क मध्ये, त्या तिमाहीतील अनुक्रमे वर्गीकरण-निहाय व फसवणुक करणारानुसार (प्रिप्रेट्रेटरवाईज) फसवणुकीची माहिती द्यावयाची आहे. विभाग ब व क मध्ये दाखविलेल्या त्या तिमाही दरम्यानच्या फसवणुकीची संख्या व एकूण रक्कम त्या अहवालच्या विभाग अ मधील स्तंभ ४ व ५ च्या बेरेजेशी जुळली पाहिजे.

४.१.३) वरील अहवालाचा एक भाग म्हणून बँकांनी प्रमाणपत्र द्यावयाचे आहे की, त्या तिमाहीमध्ये त्यांनी एफएमआर-१ मध्ये रिझर्व बँकेला कळविलेली रु १ लाख व त्यावरील रकमेची वैय्यक्तिक प्रकरणे ही त्या बँकेच्या संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली असून, एफएमआर-२ च्या भाग-१ मध्ये (स्तंभ ४ व ५) आणि भाग ब व क मध्यही समाविष्ट करण्यात आली आहेत.

### ४.१.४) फसवणुकीची प्रकरणे समाप्त (बंद) करणे.

बँकांनी फ्रॉड्स मॉनिटरिंग सेल, आरबीआय, बँकिंग पर्यवेक्षण विभाग(डीबीएस) केंद्रीत कार्यालय, मुंबई आणि डीबीएसची संबंधित प्रादेशिक कार्यालये ह्यांना अन्य कृती करता न आल्याने, बंद केलेल्या फसवणुकीच्या प्रकरणांची माहिती त्याबाबतच्या कारणांसह कळवितील.

त्या तिमाहीमध्ये बंद केलेली फसवणुकीची प्रकरणे, एफएमआर ३ ह्या तिमाही अहवालात कळविणे आवश्यक आहे व तसे आरबीआयला कळविण्यापूर्वी ती प्रकरणे एफएमआर - २ रिटर्नमधील संबंधीत स्तंभाशी तपासून पाहिली जावीत.

बँकांनी खाली दिलेल्या कृती कारवाई पूर्ण झालेली प्रकरणेच कळवावीत. :

(१) सीबीआय/पोलिस/न्यायालय ह्यामध्ये प्रलंबित असलेल्या फसवणुकीच्या प्रकरणांची वासलात (निकाली) लावण्यात आली आहे.

(२) कर्मचारी-जबाबदाऱ्यांबाबतची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

(३) फसवणुकीच्या रकमेची वसुली झाली आहे किंवा ती राइट ऑफ करण्यात आली आहे.

(४) लागु असेल तेथे विम्याच्या दाव्याची तडजोड/हिशेबपूर्ती झाली आहे.

(५) बँकेने प्रणाली व कार्यरीतींचे पुनरावलोकन केले आहे, फसवणुक होण्याबाबतचे घटक शोधले आहेत व त्रुटी दूर केल्या आहेत व ह्याबाबतची सत्यता सुयोग्य प्राधिकरणाद्वारे (बोर्ड/बोर्डाची ऑडिट कमिटी) प्रमाणित केली आहे.

(६) विशेषतः कर्मचाऱ्यांबाबतची कार्यकृती पूर्ण केली गेल्यानंतर बँकांनी प्रलंबित असलेल्या फसवणुकीच्या प्रकरणांच्या अंतिम वासलातीसाठी सीबीआयचा पाठपुरावा करावा. त्याचप्रमाणे अशा प्रकरणांच्या अंतिम वासलतीसाठी पोलिस प्राधिकरणे आणि/किंवा कोर्टाचाही पाठपुरावा करावा.

समिति अशा आकडेशास्त्रीय/अहवालाबाबत बँकांना रु २५.० लाखांपर्यतची फसवणुकीची प्रकरणे बंद करण्याची परवानगी आहे. मात्र त्यासाठी पुढील अटी आहे.

(अ) तपासकाम सुरु आहे किंवा, सीबीआर/पोलिस ह्यांनी एफआयआर दाखल केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षा अधिक काळपर्यत कोर्टीमध्ये चलान/आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही किंवा-

(ब) सीबीआय/पोलिसांद्वारे आरोपपत्र/चलान दाखल केल्यानंतरही कोर्टात दावा सुरु झालेला नाही किंवा सुरु आहे.

## ४.२) फसवणुकीवरील प्रगती अहवाल (एफएमआर - ३)

४.२.१) बँकांनी, रु १.०० लाख व त्यापेक्षा अधिक रकमेच्या फसवणुकींबाबतचे तिमाही प्रगती अहवाल, संबंधित तिमाहीची आखेर झाल्यावर १५ दिवसांच्या आत दिलेल्या एफएमआर-३ नमुन्यामध्ये, आरबीआयच्या केंद्रीय कार्यालयातील, बँकिंग पर्यवेक्षण विभागाकडे आणि त्या बँकेचे

मुख्य कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या आरबीआयच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठवावेत.

४.२.२) तिमाहीमध्ये कोणतीही प्रगती न झालेल्या फसवणुकींबाबत अशा प्रकरणांची यादी, थोडक्यात वर्णन व शाखेचे नाव आणि अहवाल पाठविल्याची तारीख ह्यासह एफएमआर-३ च्या विभाग ब मध्ये द्यावी.

## (५)संचालक मंडळाला द्यावयाचे अहवाल

### ५.१) फसवणुकी कळविणे

५.१.१) बँकांनी खात्री करुन घ्यावी की, रु ५ लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी त्या घडल्याचे आढळल्यावर लगेच त्यांच्या संचालक मंडळाना कळविल्या जातील.

५.२.१) अशा अहवालांमध्ये, इतर बाबींसह, संबंधित शाखा अधिकाऱ्यांचे व नियंत्रक अधिकाऱ्यांचे अपयश ह्याबाबत नोंद घेण्यात यावी आणि त्या फसवणुकी बाबत जबाबदार अधिकाऱ्याविरुध्द योग्य कारवाई करण्याबाबत विचार केला जावा.

### ५.२) फसवणुकीचे तिमाही पुनरावलोकन

५.२.१) आरबीआयने विहित केलेल्या पुनरावलोकनच्या कॅलेंडरचा विचार न करताही मार्च, जून व सप्टेंबर अखेर संपणाऱ्या तिमाही मधील फसवणुकींची माहिती, संबंधित तिमाहीनंतरच्या महिन्यात, संचालक मंडळ/व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात यावी.

५.२.२) ह्या माहितीसोबत, प्रत्येक फसवणुकींसंबंधाने विश्लेषक अशी आकडेशास्त्रीय पूरक माहिती देण्यात यावी. त्यामुळे संचालक मंडळाच्या ऑडिट कमिटीला फसवणुकींबाबत शिक्षा व प्रतिबंध ह्याबाबत सुयोग्य साहित्य मिळण्यास मदत होईल.

५.२.३) खाली विहित केल्याप्रमाणे डिसेंबर वर्ष अखेरच्या वार्षिक पुनरावलोकनाचा विचार करता डिसेंबर अखेरच्या तिमाहीसाठी वेगळे पुनरावलोकन देण्याची आवश्यकता नाही.

५.२.४) बोर्डाची ऑडिट कमिटी (एसीबी) सर्वसाधारणतः फसवणुकींच्या सर्व प्रकरणांवर देखरेख ठेवत असली तरीही, रु १.०० कोटी व त्यावरील रकमेच्या फसवणुकींच्या प्रकरणांसाठी, बँकांनी, देखरेख व पाठपुरावा करण्यासाठी एक खाससमिती तयार करणे अत्यावश्यक आहे ह्या खास समितीमध्ये, सार्वजनिक बँकांच्या बाबतीत सीएमडी व एसबीआय/तिच्या सहकारी बँकांच्या बाबतीत एमडीचा समावेश असावा. खाजगी क्षेत्रातील बँकांसाठी हयात आरबीआयचे नामनिर्देशित सोडल्यास एसीबीमधील दोन सभासद व संचालक मंडळातील दोन सभासद असावे.

अशा स्पेशल कमिटीची मुख्य कार्ये म्हणजे, पुढे दिल्याप्रमाणे, रु १.०० कोटी व त्यावरील रकमेच्या फसवणुकींबाबत देखरेख ठेवणे व पुनरावलोकन करणे.

- फसवणुक होण्यास कारणीभूत असलेल्या प्रणालीमधील त्रुटी शोधणे आणि त्या बंद करण्यास उपाय योजणे.

- फसवणुक उघडकीस आणण्यामधील विलंबाची कारणे शोधून ती बँकेच्या सर्वोच्च व्यवस्थापनाला व आरबीआयला कळविणे.

- सीबीआय/पोलिस ह्यांच्या तपासकामाच्या प्रगतीवर व वसुलीच्या स्थितिवर देखरेख ठेवणे.

- फसवणुकीच्या सर्व प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांची जबाबदारी तपासली गेली आहे व आवश्यक असल्यास कर्मचाऱ्यांवरील कारवाई लवकरात लवकर पूर्ण करण्यात आली आहे ह्याची खात्री करुन घेणे.

- फसवणुक टाळण्यासाठी, बँकांमधील नियंत्रणे अधिक बळकट करणे ह्या सारख्या उपायांचे परिणामकारकतेचे पुनरावलोकन करणे.

- फसवणुकीं विरुध्दचे प्रतिबंधक उपाय बळकट करण्यास उपयुक्त असे अन्य उपाय सुरु करणे.

भारतातील सर्व वाणिज्य बँकांच्या बाबतीत, रु १.०० कोटी व त्यावरील रकमेच्या सर्व फसवणुकींवर, बोर्डाच्या खास समितिने देखरेख ठेवून पुनरावलोकन केले पाहिजे. अशा खास समितिच्या सभांची नियतकालिकता ही प्रकरणांच्या संख्येवर ठरवली जाईल. तथापि, ह्या समितिने, जेव्हाजेव्हा रु १.०० कोटी किंवा त्यावरील रकमेची फसवणुकी उघडकीस येईल तेव्हा सभा घेऊन पुनरावलोकन करावे.

## ५.३) फसवणुकीचे वार्षिक पुनरावलोकन

५.३.१) बँकांनी फसवणुकींचे वार्षिक पुनरावलोकन करुन संचालक मंडळ/सल्लागार मंडळासमोर त्यांच्या माहितीसाठी टिप्पणी ठेवावी. डिसेंबर अखेर संपलेल्या वर्षासाठी असलेली पुनरावलोकने पुढील वर्षाच्या मार्च अखेरपूर्वी मंडळासमोर ठेवावीत ही, रिझर्व बँकेच्या निरीक्षक अधिकाऱ्यांच्या पडताळणीसाठी जपून ठेवावीत.

५.३.२) अशा प्रकारचे पुनरावलोकन करतेवेळी विचारात घ्यावयाचे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) फसवणुक केली गेल्यावर, कमीतकमी वेळात, त्या उघडकीस आणण्यासाठी बँकेतील प्रणाली सक्षम आहेत काय.

(ब) कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून फसवणुकींची तपासणी केली आहे काय, आणि आवश्यक तेथे, सार्वजनिक बँकांच्या बाबतीत, पुढील कारवाईसाठी त्या व्हिजिलन्स सेलला कळविण्यात आल्या आहेत काय.

क) जबाबदार ठरलेल्या व्यक्तीला, आवश्यक तेथे, प्रतिरोधक अशी शिक्षा देण्यात आली आहे काय.

ड)प्रणाली व कार्यरीतींचे पालन करण्यामधील ढिलाईमुळे फसवणुकी झाल्या आहेत काय व तसे असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यां कडून प्रणाली व कार्यरीतींचे काटेकोरपणे पालन केले जाण्याबाबत कारवाई करण्यात आली आहे काय.

ई) भारत सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार फसवणुकींबाबत, लागु असेल त्या नुसार स्थानिक पोलिस किंवा सीबीआयला पुढील तपासासाठी कळविण्यात आले आहे काय.

५.३.३) वार्षिक पुनरावलोकनात, इतर बाबींसह पुढील माहितीचाही समावेश असावा :

अ) मागील दोन वर्षांच्या तुलनेत, ह्या वर्षात उघडकीस आलेल्या एकूण फसवणुकी व संबंधित रक्कम.

ब) परिच्छेद २.३ मध्ये दिल्याप्रमाणे निरनिराळ्या वर्गवारीनुसार फसवणुकींचे विश्लेषण आणि शिल्लक फसवणुकींच्या तिमाही अहवालामध्ये (एफएमआर-२ अनुसार) निर्देशित केलेली निरनिराळी व्यापारी/व्यवहार क्षेत्रे.

क) वर्षभरामध्ये कळविलेल्या प्रमुख फसवणुकींची कार्यरीत आणि त्याबाबत सध्याची स्थिती.

ड) रु १ लाख व त्यामधील रकमेच्या फसवणुकींची सविस्तर विशलेषणे.

इ) फसवणुकींमुळे वर्षभरात बँकेचे झालेले नुकसान, वसूल झालेली रक्कम व तरतुदी.

फ) जेथे कर्मचाऱ्यांचा संबंध आहे अशा प्रकरणांची संख्या (रकमेसह) आणि कर्मचाऱ्यांविरुध्द केलेली कारवाई.

ग) फसवणुकींची प्रदेशनिहाय/क्षेत्रनिहाय/राज्यनिहाय विभागणी व संबंधित रक्कम.

ह) फसवणुकी उघडकीस आणण्यात लागलेला वेळ (तीन महिने, सहा महिने, व एक वर्षामध्ये, फसवणुकी घडल्यापासून त्या उघडकीस आल्याचा कालावधी)

आय) सीबीआय/पोलिस ह्यांना कळविलेल्या फसवणुकींची स्थिती.

ज) बँकेने अंतिम कृति केली आहे अशा फसवणुकींची संख्या व वासलात झालेली प्रकरणे.

के) फसवणुकींचे प्रसंग कमी/न्यूनतर करण्यासाठी बँकेने केलेले प्रतिरोधक/दंडात्मक उपाय.

## (६) पोलिस/सीबीआय ह्यांना फसवणुकी कळविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

६.१) राज्य पोलिस प्राधिकरणांकडे, अवैध पारितोषिकांसाठी बँकेने अनाधिकृत क्रेडिट, नोष्काळजीपणा, व रोख रकमेत तूट, फसविणे, बनवाबनवी इत्यादी कळविण्यासाठी खाजगी क्षेत्रातील बँकांनी (भारतात कार्यरत असलेल्या विदेशी बँकांसह) पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे :-

अ) फसवणुक/अफरातफरीची प्रकरणे हाताळतांना बँकांनी केवळ संबंधित रक्कम तातडीने परत मिळविण्याचा हेतु ठेवू नये, तर जनतेच्या हिताच्या दृष्टिने दोषी व्यक्ति विना-शिक्षा सुटून जाणार नाहीत ह्याचीही खात्री करून घ्यावी.

ब) ह्यासाठी, एक सर्वसाधारण नियम म्हणून पुढील प्रकरणे न चुकता राज्य पोलिसनांच कळवावीत.

१) बाहेरील व्यक्तींनी स्वतःहून आणि/किंवा बँकेचे कर्मचारी/मॅनेजर्स ह्यांच्या संगनमताने रु १.०० लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकीची प्रकरणे.

२) बँकेच्या कर्मचाऱ्यांची रु १०,०००/- पेक्षा अधिक असलेल्या बँकेच्या पैशांच्या फसवणुकीची प्रकरणे.
क) रु १.०० कोटी व त्यावरील रकमेच्या फसवणुकीची प्रकरणे, संचालक, सिरियस फ्रॉड इन्व्हेस्टिगेशन ऑफिस (एसएफआयओ), कंपनी अफेअर्स मंत्रालय, भारत सरकार, दुसरा मजला, पर्यावरण भवन, सीजीओ कॉंप्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली ११० ००३ ह्यांनाही कळवावीत अशा फसवणुकींची सविस्तर माहिती एफएमआर-१ नमुन्यात एसएफआयओकडे पाठविण्यात यावी.

६.२) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी खालीलप्रमाणे रु.१कोटी व त्यावरील रकमेची प्रकरणे सीबीआयकडे व रु १ कोटीपेक्षा कमी रकमेची प्रकरणे स्थानिक पोलिसांना कळवावीतः-
सीबीआयकडे पाठवावयाची प्रकरणे.
अ) रु १.०० कोटी व त्यापेक्षा अधिक व रु ५.०० कोटीपर्यत्ची प्रकरणे

- जेथे कर्मचारीच गुंतला असल्याचे प्रथमदर्शनीच स्पष्ट झाले असल्यास - सीबीआय(अँटी करप्शन ब्रँच)
- जेथे कर्मचारीच गुंतला असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट न झाल्यास-सीबीआय (इकॉनॉमिक ऑफेन्सेस विंग)

ब) रु ५.०० कोटीपेक्षा अधिक रकमेची प्रकरणे संबंधित केंद्रांचे बँकिंग सिक्युरिटी अँड फ्रॉड सेल्स-बँकांमधील मोठ्या फसवणुकींच्या प्रकरणांसाठी हा सीबीआयच्या इकॉनॉमिक ऑफेन्सेस विंग चा विशेष कक्ष आहे.
**स्थानिक पोलिसांकडे कळवावयाची प्रकरणे**
रु १.०० कोटीपेक्षा रकमेची प्रकरणे - स्थानिक पोलिस.
१) रु १.०० लाख व त्यावरील रकमेच्या, बाहेरील व्यक्तींचा (खाजगी पक्ष) आणि बँकेतील कर्मचाऱ्यांचा संबंध असलेली वित्तीय फसवणुकींची प्रकरणे, संबंधित बँकेच्या प्रादेशिक प्रमुखाने, संबंधित राज्याच्या राज्य सीआयडी/इकॉनॉमिक ऑफेन्सेस विंगच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला कळवावीत.
२) रु १०,०००/- पेक्षा कमी असलेली व बँक अधिकाऱ्यांचा संबंध असलेली फसवणुकीची सर्व प्रकरणे त्या बँकेच्या प्रादेशिक प्रमुखांना कळवावीत तो प्रमुख प्रत्येक प्रकरणांची छाननी करुन ते प्रकरण स्थानिक पोलिसांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी कळविण्याबाबत संबंधित बँकेला निदेश देईल.
**६.३) डीडी/टीटी/पेऑर्डर्स/चेक्स/डिव्हिडंड वॉरंट्स इत्यादींचे लबाडीने रोखीकरण ह्याबाबत पोलीस तक्रार दाखल करणे.**

६.३.१) बनावट कागदपत्रांनी केलेल्या फसवणुकींच्या बाबतीत, प्रदान करणाऱ्या बँकरने तक्रार नोंदवावी-गोळा करणाऱ्या बँकरने नव्हे.
६.३.२) तथापि, खऱ्या असलेल्या संलेखाद्वारे, त्याचा मालक नसलेल्या व्यक्तीने लबाडीने रक्कम गोळा केल्यास, फसविल्या, गेलेल्या गोळा करणाऱ्या बँकेने पोलिस तक्रार नोंदवायची आहे.
६.३.३) संलेख गोळा करताना तो वटविण्यापूर्वीच खात्यात जमा झाल्यानंतर तो संलेख खोटा/बनावट असल्याचे आढळून तो प्रदान करणाऱ्या बँकेने गोळा करणाऱ्या बँकेने पोलिस तक्रार दाखल करावी. कारण, तो संलिख वटविण्यापूर्वीच त्याची रक्कम दिली गेल्याने त्या बँकेचा तोटा झाला आहे.
६.३.४) त्याच बँकेच्या दोन किंवा अधिक शाखांचा संबंध असलेल्या खोडाखोड केलेला/खोटा चेक गोळा करण्याबाबत, ज्या शाखेत तो खोडाखोड केलेला/खोटा चेक वटाविला गेला आहे त्या शाखेने पोलिस तक्रार नोंदवावी.
६.३.५) सीबीएसखाली दोन किंवा अधिक शाखांचा संबंध असेल व खोडाखोड केलेल्या/ खोट्या चेकेचे पैसे दिले गेले असतील, तेथे अशा लबाडीने केलेल्या निकासीबाबत ज्या शाखेने पैसे दिले असतील, त्या शाखेने पोलिस तक्रार नोंदवावी.

**(७) चोरी, बँकफोडी, डाका व बँक लुटण्याची प्रकरणे कळविणे.**
७.१) बँकफोडी, डाके, चोऱ्या व बँक लुटण्याबाबतच्या घटना घडल्याबरोबर बँकांनी त्याबाबतची माहिती प्राधिकरणांना फॅक्स/ईमेलने कळविली पाहिजे.
अ) मुख्य प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, भारतीय रिझर्व बँक, बँकिंग पर्यवेक्षण विभाग, केंद्रीय कार्यालय, मुंबई.
ब) त्या बँकेचे मुख्य कार्यालय, ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली आहे, त्या रिझर्व बँकेच्या बँकिंग पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे
क) संबंधित प्राधिकरणांबरोबर, राज्य स्तरीय सुरक्षा समितीच्या सभांमध्ये, ग्रस्त झालेल्या शाखांमधील सुरक्षा उपायांवरील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी, ती ग्रस्त बँक रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रा खाली येते त्या कार्यालयाचा पर्यवेक्षण विभाग
ड) सुरक्षा सल्लागार, केंद्रीय सुरक्षा कक्ष, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय इमारत, मुंबई-४००००१
ई) वित्त मंत्रालय, इकॉनॉमिक अफेअर्स विभाग (बँकिंग विभाग), भारत सरकार नवी दिल्ली.

ह्या अहवालामध्ये फसवणुकीची कार्यरीत व इतर माहिती, एफएमआर - ४ मधील स्तंभ १ ते ११ मध्ये दिल्यानुसार समाविष्ट केली जावी.

७.२) बँकांनी रिझर्व बँकेच्या केंद्रीय कार्यालयामधील बँकिंग पर्यवेक्षण विभागाकडे, तसेच, त्या बँकेचे मुख्य कार्यालय रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते त्या कार्यालयाकडे, त्या तिमाहीशी संबंधीत अशी सर्व प्रकरणे एकत्रित केलेला तिमाही अहवाल एफएमआर-४ मध्ये देलेल्या नमुन्यात सादर करावा. हा अहवाल, सबंधित तिमाही संपल्यावर १५ दिवसांच्या आत सादर केला जावा.
७.३) ज्या बँकांच्या बाबतीत चोरी, बँकफोडी, डाका, आणि/किंवा दरोडा ह्यांचे एकही प्रकरण तिमाहीत घडले नसेल त्यांनी **'निल'** रिपोर्ट पाठवावा.

**एफएमआर-१**

**बँकांमधील प्रत्यक्ष किंवा संशयित फसवणुकीबाबत अहवाल**

(परिच्छेद ३ अन्वये)

भाग अः फसवणुकीचा अहवाल

| | |
|---|---|
| १) बँकेचे नाव | |
| २) फसवणुक क्रमांक १ | |
| ३) शाखेची माहिती २ | |
| अ) शाखेचे नाव | |
| ब) शाखेचा प्रकार | |
| क) स्थळ | |
| ड) जिल्हा | |
| ई) राज्य | |
| ४) मुख्य पक्षाचे/खात्याचे नाव ३ | |
| ५. अ. फसवणुक झालेले क्षेत्र ४ | |
| ५. ब. फसवणुक कर्जखात्यात झाली काय? | होय/नाही |
| ६. अ फसवणुकीचे स्वरुप ५ | |
| ६. ब. फसवणुक करताना संगणकाचा उपयोग | |
| ६. क. होय असल्यास त्याबाबतची माहिती. | |
| ७) संबंधित एकूण रक्कम ६ (रु लाखमध्ये) | |
| ८. अ. घडल्याची तारीख ७ | |
| ८. ब. उघडकीस आल्याची तारीख ८ | |
| ८. क. फसवणुक उघडकीस घेण्यातील विलंबाची कारणे | |
| ८. ड. आरबीआयला कळविले गेल्याची तारीख | |
| ८. ई. आरबीआयला फसवणुक कळवीण्यातील विलंबाची कारणे | |
| ९. अ. थोडक्यात पूर्वेतिहास | |
| ९ .ब. कार्यकारी रीत | |
| १०) फसवणुक कोणी केली | |
| अ. कर्मचारी | होय/नाही |
| ब. ग्राहक | होय/नाही |
| क. बाहेरील व्यक्ति | होय/नाही |
| ११ अ. शाखेने सादर केलेल्या कंट्रोल रिटर्न्सच्या छाननीद्वारे नियंत्रक कार्यालय (प्रादेशिक/क्षेत्रीय) ती फसवणुक शोधू शकेल काय | होय/नाही |
| ब. माहिती देण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे काय. | होय/नाही |
| १२. अ. फसवणुक प्रथम घडल्याची तारीख व ती | होय/नाही. |

| | |
|---|---|
| उघडकीस आल्याची तारीख ह्या दरम्यान त्या शाखे/शाखांमध्ये अंतर्गत तपासणी/ऑडिट (कॉंकरंट ऑडिटसह) केले गेले होते काय? | |
| ब. होय असल्यास, अशा तपासणी/ऑडिटमध्ये ती फसवणुक का उघडकीस आली नाही? | |
| क. अशा तपासणी/ऑडिट दरम्यान ती फसवणुक उघडकीस न आल्यामुळे कोणती कारवाई करण्यात आली? | |
| १३. केलेली/करावयाची कारवाई | |
| अ. सीबीआय/पोलिस तक्रार | |
| (१) पोलिस/सीबीआयकडे तक्रार दाखल केली आहे काय? | होय/नाही |
| (२) होय असल्यास सीबीआय/पोलिस ह्यांच्या कार्यालयाचे/शाखेचे नाव. | |
| १)संदर्भाची तारीख | |
| २) प्रकरणाची सध्याची स्थिती | |
| ३) पोलिस/सीबीआयचा तपास पूर्ण झाल्याची तारीख | |
| ४) पोलिस/सीबीआय्द्वारे तपासकामाचा अहवाल सादर केल्याची तारीख | |
| (३)पोलिस/सीबीआयला कळविले नसल्यास त्याची कारणे. | |
| ब. डीआरटी/कोर्ट मध्ये दाखल केलेला खटला. | |
| १) दाखल केल्याची तारीख | |
| २) सध्याची स्थिती | |
| क. विम्याबाबत दावा | |
| १) एखाद्या विमा कंपनीकडे दावा दाखल केला आहे काय? | होय/नाही. |
| २) तसे नसल्यास त्याचे कारण. | |
| ड. कर्मचाऱ्यांच्या बाबत केलेली कारवाई | |
| १) काही अंतर्गत चौकशी/तपास करण्यात आला आहे का/करण्याचे ठरत आहे का? | होय/नाही. |
| २) होय असल्यास तो पूर्ण झाल्याची तारीख | |
| ३) काही विभागीय चौकशी केली आहे काय/करण्याचे ठरत आहे काय? | |
| ४) होय असल्यास खालील नमुन्यानुसार माहिती द्यावी. | |
| ५) नाही असल्यास त्याची कारणे | |
| ई. अशा घटना घडू नयेत ह्यासाठी केलेले/करण्यात येणारे उपाय | |

| | |
|---|---|
| १४. वसूल झालेली एकूण रक्कम | |
| १) संबधित पक्षाकडून वसुल केलेली रक्कम | |
| २) विमा कंपनीकडून | |
| ३) अन्य स्त्रोतांकडून | |
| ब. बँकेला झालेला तोटा | |
| क. त्यासाठी ठेवलेली तरतुद | |
| ड. राईट ऑफ केलेली रक्कम | |
| १५. आरबीआयच्या विचारासाठी सूचना | |

**कर्मचाऱ्यांबाबत कारवाई**

| अनु. क्र. | नाव | पदनाम | प्रलंबन केले काय? त्याची तारीख | आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | अंतर्गत चौकशी सुरु केल्याची तारीख | अंतिम आदेश दिल्याची तारीख | दिलेली शिक्षा | खटला भरणे/दोषी ठरविणे/दोष मुक्त होणे ह्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

*शाखेमध्ये सुरु केलेल्या तपासणी/ऑडीटचा प्रकार निर्देशित करावा.

**भाग ब: कर्ज खात्यामधील फसवणुकींवरील अतिरिक्त माहिती**

(रु ५ लाख व त्यावरील रकमेच्या सर्व कर्ज खात्यांमधील फसवणुकींबाबत हा भाग पूर्ण करण्यात यावा.)

| अनु. क्र. | पक्षाचा प्रकार | पक्ष/खात्याचे नाव | पक्षाचा पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**कर्ज खात्याचा तपशील**

| पक्ष अनु. क्र. | पक्ष खात्याचे नाव | कर्ज खात्याचा अनुक्रमांक | खात्याचा प्रकार | मंजुरीची तारीख | मंजुरीप्राप्त मर्यादा | शिल्लक येणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**कर्ज खात्याबाबत मालक/संचालकाची माहिती**

| पक्ष /खात्याचे नाव | अनुक्रमांक सहयोगी संस्था | सहयोगी संस्थाचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**संलग्न संस्थेच्या संचालक/मालकां ची माहिती**

| संलग्न संस्थाचे नाव | अनुक्रमांक | संचालकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**फसवणुकीचा अहवाल (एफएमआर-१) तयार करण्यासाठी सूचना**

१) **फ्रॉड (फसवणुक) नंबरः** संगणकीकरण व संदर्भ शोधण्यास मदत व्हावी म्हणून हा देण्यात आला आहे. हा आल्फान्युमरिक क्रमांक असून त्यात पुढील गोष्टी आहेत : चार अक्षरे (बँकेच्या नावासाठी), दोन अंक वर्ष निर्देशित करण्यासाठी (०२, ०३ इत्यादी), तिमाहीसाठी दोन अंक ( जानेवारी ते मार्च ०१ इत्यादी) व अखेरचे चार अंक हे तिमाहीमध्ये कळविलेल्या फसवणुकीसाठी स्पष्ट धावते अंक.

२) **शाखेचे नावः** फसवणुकीत एकापेक्षा अधिक शाखांचा संबंध असल्यास, जेथे रक्कम सर्वाधिक आहे आणि/किंवा जी सर्वात जास्त संबंधित आहे त्या शाखेचे नाव द्यावे. इतर शाखांची नावे, थोडक्यात पूर्वेतिहास/ कार्यरीत ह्या बाबत क्र.९ मध्ये दिली जावीत.

३) **पक्षाचे नावः** फसवणुकीची ओळख पटविण्यासाठी स्पष्टपणे नाव दिले जावे. कर्जखात्यातील फसवणुकींसाठी कर्जदारांची नाव दिली जावीत. कर्मचाऱ्यांनी केलेल्या फसवणुकींबाबत, फसवणुकी ओळख पटविण्यासाठी, त्या कर्मचाऱ्याचे/कर्मचाऱ्यांची नाव/नावे दिली जावीत. जेथे फसवणुक झालेली आहे, (म्हणजे क्लियरिंग अकाउंट/आंतर शाखा खाते) व ह्या फसवणुकीत एखाद्या विशिष्ट कर्मचाऱ्याचा हात असल्याचे लगेच कळून येत नसल्यास त्याची ओळख “क्लियरिंग/ आंतर शाखा खात्यातील फसवणुक” ह्या नावाने करावी.

४) **फसवणुक आढळून आलेले क्षेत्रः** एफएमआर-२ (भाग अ) विवरणपत्रातील स्तंभ-१ मध्ये दिलेल्या संबंधित क्षेत्र द्यावे (रोकड, ठेवी/बचत/चालु/मुदत), अनिवासी खाती, अग्रिम राशी (कॅश क्रेडिट/मुदत कर्जे/बिल्स/इतर), विदेशी मुद्रा व्यवहार, आंतरशाखा खाटी, चेक्स डिमांड ड्राफ्ट्स

इत्यादी, समाशोधन इत्यादी खाती, ताळेबंदाबाहेरील बाबी (पतपत्रे/हारी/सहस्वीकार/इतर), कार्ड/इंटरनेट/क्रेडिट कार्डस, एटीएम/डेबिट कार्डस, इंटरनेट बँकिंग, इतर

५) **फसवणुकीचा प्रकारः** त्या फसवणुकीचे योग्य वर्णन करता येईल असा अंक पुढे दिलेल्या संबंधित वर्गीकरणातून निवडावा :- १) अफरातफर व गुन्ह्याच्या स्वरुपाचा विश्वासघात २) बनावट/संलेखाचा उपयोग करून/खाते पुस्तकात फेरफार करून किंवा खोट्या/बनावट खात्यांद्वारे किंवा मालमत्तेच्या रुपांतरणाद्वारे फसवणुक करुन रोखीकरण करणे. ३) बक्षिस किंवा बेकायदेशीर लाभासाठी अनधिकृत कर्जसुविधा देऊ करणे. ४) निष्काळजीपणा रोख रकमेतील तूट. ५) फसविणे व खोटे दस्ताऐवज देणे. ६) विदेशी मुद्रा व्यवहारातील अनियमितता. ७) इतर

६) **संबंधित एकूण रकमः** सर्व ठिकाणी रक्कम ही लक्ष रुपयात दोन दशांश स्थळांपर्यंत दिली जावी.

७) **आढळण्याची तारीखः** फसवणुक घडण्याची नेमकी तारीख देणे कठीण असल्यास, (उदा. काही कालावधीमध्ये गळती झालेली असल्यास किंवा कर्जदाराने केलेली विशिष्ट कृती व नंतर ती फसवणुकीची कृती असल्याचे ठरल्यावर ती नेमकी कोण्त्या तारखेस केली गेली ते ठरवता न असल्यास) त्या व्यक्तीने फसवणुक करण्याची शक्यता असलेली सर्वात आधीची तारीख दिली जावी. (उदा. सन २००२ ह्या वर्षात केल्या गेलेल्या फसवणुकीसाठी १ जानेवारी २००२ ही तारीख घ्यावी), ज्या कालावधीमध्ये फसवणुक करण्यात आली आहे असा विशिष्ट तपशील, पूर्वेतिहास/कार्यरीतमध्ये देण्यात यावा.

८) **उघडकीस आल्याची तारीख :** नेमकी तारीख उपलब्ध नसल्यास (म्हणजे, तपासणी/ऑडिट दरम्यान एखादी फसवणुक उघडकीस असल्यास किंवा रिझर्व बँकेच्या निदेशानुसार एखादा व्यवहार फसवणुक असल्याचे कळविले गेल्यास) ती फसवणुक म्हणून उघडकीस आल्याची तारीख म्हणून एखादी नाममात्र तारीख देण्यात यावी.

९) **आरबीआयला कळविण्याची तारीखः** आरबीआयकडे, एफएमआर-१ फॉर्ममध्ये रिपोर्ट पाठविण्याची तारीख हीच कळविण्याची तारीख धरली जाईल. तत्पूर्वी त्याबाबत पाठविलेल्या फॅक्स किंवा डीओ पत्राची तारीख नव्हे.

*शाखेमध्ये कोणत्या प्रकारचे ऑडिट (उदा. कॉंकरंट ऑडिट, अंतर्गत तपासणी इत्यादी) सुरु करण्यात आले आहे ह्याची वर्गवार माहिती बँकांनी द्यावी.

**एफएमआर-२**
**शिल्लक असलेल्या फसवणुकीवरील तिमाही अहवाल**
**बँकेचे नाव**
**रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अहवाल**

**देशांतर्गत (विदेशातील)**

**भाग - अ शिल्लक फसवणुकी** **(रक्कम रु. लक्षमध्ये)**

| वर्ग | मागील तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत कळविलेली प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत बंद केलेली प्रकरणे | | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसूल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या आखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतुद | विद्यमान तिमाहीमध्ये वसूल झालेली रक्कम | विद्यमान तिमाहीत राईट ऑफ केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या (२ +४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| रोख | | | | | | | | | | | | |
| ठेवी<br>१)बचत<br>२)चालु<br>३)मुदत ठेवी | | | | | | | | | | | | |

| वर्ग | मागील तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत कळविलेली प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत बंद केलेली प्रकरणे | | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसूल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या आखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतुद | विद्यमान तिमाहीमध्ये वसूल झालेली रक्कम | विद्यमान तिमाहीत राईट ऑफ केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या (२ +४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| अनिवासी खाती | | | | | | | | | | | | |
| अग्रिम राशी<br>१) कॅश क्रेडिट<br>२) मुदत कर्जे<br>३) बिल्स<br>४) इतर | | | | | | | | | | | | |
| विदेशी मुद्रा | | | | | | | | | | | | |
| आंतर शाखा खाली | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी | | | | | | | | |
| क्लियरिंग इत्यादी | | | | | | | | |

| वर्ग | मागील तिमाहीच्या अखेरीस शिल्लक प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत कळविलेली प्रकरणे | | विद्यमान तिमाहीत बंद केलेली प्रकरणे | | तिमाहीच्या अखेरीस शिल्लक असलेली प्रकरणे | | वसूल झालेली एकूण रक्कम | तिमाहीच्या आखेरीस शिल्लक प्रकरणांसाठी ठेवलेली तरतुद | विद्यमान तिमाहीमध्ये वसूल झालेली रक्कम | विद्यमान तिमाहीत राईट ऑफ केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या (२ +४-६) | रक्कम (३+५-७) | रक्कम | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ताळेबंदा बाहेरील<br>१)पतपत्रे<br>२)हमी<br>३)सह-स्वीकार<br>४)इतर | | | | | | | | | | | | |
| कार्ड/इंटरनेट<br>१)क्रेडिट कार्डस | | | | | | | | | | | | |
| २)एटीएम/डेबिट कार्डस | | | | | | | | | | | | |
| ३)इंटरनेट बँकिंग | | | | | | | | | | | | |
| ४)इतर | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | |

**टीपः** विदेशात कार्यालये/शाखा असलेल्या भारतीय बँकांसाठी, वरील आकडे हे देशांतर्गत स्थितीसंबंधाने आहेत. विदेशातील शाखा/कार्यालये ह्याबाबतचे आकडे, ह्याच नमुन्यात वेगळ्या कागदावर दिले जावेत.

**भाग - बः तिमाहीमध्ये कळविलेल्या फसवणुकींचे प्रकारानुसार वर्गीकरण**

**बँकेचे नाव** ______________________________________________

| वर्ग | अफरातफर व गुन्हेगारी स्वरुपाचा विश्वासघात | | लबाडीने रोखीकरण/खातेपुस्तकात लबाडीने फेरफार आणि मालमत्तेचे रुपांतर | | बेकायदेशीर लाभासाठी दिलेली अनाधिकृत कर्ज सुविधा | | निष्कआलजीपणा व रोख रकमेत तूट | | फसविणे व बनावटगिरि | | विदेशी मुद्रेमध्ये अनियमितता | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रककम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | संख्या | रक्कमा | संख्या | रक्कमा | संख्या | रक्कम | संख्या | रक्कमा | संख्या |
| रु एक लाखापेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु १लाखापेक्षा जास्त रु १०० लाखापेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु१०० लाख व त्यापेक्षा अधिक | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

**भाग - क: तिमाहीमध्ये कळविण्यात आलेल्या फसवणुकींचे गुन्हेगार निहाय वर्गीकरण**

**बँकेचे नाव** ________________________________________

| वर्ग | कर्मचारी | | ग्राहक | | बाहेरील व्यक्ती | | कर्मचारी व ग्राहक | | कर्मचारी व बाहेरील व्यक्ती | | ग्राहक व बाहेरील व्यक्ती | | कर्मचारी, ग्राहक व बाहेरील व्यक्ती | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्क म | संख्या | रक्कम |
| रु १ लाखपेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु १ लाखच्या वर पण रु १०० लाखपेक्षा कमी | | | | | | | | | | | | | | | | |
| रु १०० लाख व अधिक | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

**टीप:** १) वरील प्रकार-निहाय वर्गीकरण भारतीय दंड संहितेच्या निरनिराळ्या तरतुदींवर आधारित असे आहे.

२) सर्व रकमा रु. लाखामध्ये दोन दशांश स्थळापर्यंत द्याव्यात.

**प्रमाणपत्र** प्रमाणित करण्यात येत आहे की, गेल्या तिमाहीत रिझर्व बँकेला कळविण्यात आलेल्या रु १ लाख व त्यावरील रकमेच्या फसवणुकी, ह्या बँकेच्या संचालक मंडळालाही कळविण्यात आल्या असून, त्या वरील भाग अ (स्तंभ ४ व ५) आणि भाग ब व क मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

सही ____________________________

नाव व पदनाम ____________________________

स्थळ __________________________________

तारीख ___________________

**एफएमआर - ३**
**मोठ्या रकमेच्या फसवणुकींवरील तिमाही प्रगती अहवाल**

**बँकेचे नाव ______________________**
**रोजी संपलेल्या तिमाहीसाठी विवरणपत्र ___________________________**

**भाग अ : सारांशरुपाने माहिती**

| | | संख्या | संबंधित रक्कम (रु - लाख) |
|---|---|---|---|
| १ | शिल्लक प्रकरणे | | |
| २ | कोणतीही प्रगती नसलेली प्रकरणे (खाली दिलेल्या भाग ब मधील नमुन्यानुसार प्रकरण - निहाय तपशील द्यावा. | | |
| ३ | प्रगती असलेली प्रकरणे (खालील भाग क मधील नमुन्यानुसार प्रकरण - निहाय तपशील द्यावा. | | |

**भाग बः कोणतीही प्रगती नसलेल्या प्रकरणांचा तपशील**

| **क्र.** | **शाखाचे नाव** | **फसवणुक क्र.** | **पक्ष/ खात्याचे नाव** | **रक्कम (रु लाख मध्ये** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**भाग क : प्रगतीचा प्रकरण निहाय तपशील**

**पक्ष/खात्याचे नाव __________________**
**शाखा/कार्यालयाचे नाव ______________________**
**संबंधित रक्कम__________________________**
**(रु. लाखमध्ये)**
**फसवणुक क्रमांक _______________________**

| | |
|---|---|
| १) सर्वप्रथम कळविण्याची तारीख | |
| २)<br>अ. डीआरटी/कोर्ट मध्ये वसुलीच्या दावा दाखल करण्याची तारीख | |
| ब. सध्याची स्थिती | |
| ३) मागील तिमाही मध्ये केलेली वसुली (रु लाख) | |
| ४) ह्या तिमाहीत केलेली वसुली | |
| अ. संबंधित पक्षांकडून | |
| ब. विम्याच्या रुपाने | |
| क. इतर स्त्रोतांमधून | |
| ५) एकूण वसुली (३+४) (रु लाख) | |
| ६) बँकेला आलेला तोटा (रु लाख) | |
| ७) ठेवलेली तरतुदी (रु लाख) | |
| ८) राईट - ऑफ केलेली रक्कम (रु लाख) | |
| ९)अ. पोलिस/सीबीआय ह्यांना प्रकरण कळविण्याची तारीख | |
| ब. पोलिस/सीबीआय तपास पूर्ण झाल्याची तारीख | |
| क. पोलिस/सीबीआयद्वारे तपासणीचा अहवाल सादर केल्याची तारीख | |
| १०) कर्मचाऱ्यांबाबत केलेल्या कारवाईचा तपशील | |

| क्र. | नाव | पदनाम | निलंबित केले काय/निलंबनाची तारीख | आरोपपत्र दिल्याची तारीख | अंतर्गत चौकशी सुरु केल्याची तारीख | अंतिम आदेश देण्याची तारीख | चौकशी पूर्ण झाल्याची तारीख | दिलेली शिक्षा | खटला भरण्याची/ दोषी ठरविण्याची/सुटका होण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| ११) इतर घडामोडी | |
| १२) ह्या तिमाहीत प्रकरण बंद करण्यात आले काय? | होय/नाही |
| १३) बंद करण्याची तारीख | |

## एफएमआर-४

## डाका/लूटमार/चोरी/ बँकफोडीवरील अहवाल
## (परिच्छेद ७ अनुसार)

**बँकेचे नाव ____________________**

**____________________________रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अहवाल**

| शाखेचे नाव | पत्ता | जिल्हा | राज्य | १० शाखेचा प्रकार | जोखीम वर्गीकरण ११ | करन्सी चेस्ट शाखा आहे काय | प्रकरणाचा प्रकार १२ | घडल्याची तारीख व वेळ | संबंधित रक्कम (रु लाख) | वसुलझालेली रक्कम (रु लाख) | विम्याच्या दाव्याची तरजोड (रु लाख) | अटक करण्यात आली | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | कर्मचारी | डाकू |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |

| ठार झाले | | | जखमी | | दोषी सिध्द | | दिलेला मोबदला प्रत्यक्ष रुपयात | | केलेली कारवाई | गुन्हा क्रमांक आणि जेथे गुन्हा दाखल केला त्या पोलिस स्टेशनचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्मचारी | चोर | इतर | कर्मचारी | इतर | कर्मचारी | चोर | | | | | |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | | | | | | | |

---------------

१० ग्रामीण/अर्धनागरी/नागरी/महानागरी

११ उच्च/सर्वसाधारण/नीच

१२ डाका/दरोडा/चोरी/लुटमार